
# ४. माहिती घेऊया



पाऊस केव्हा पडेल? किती पडेल? याची देशभर चिंता असते. ही चिंता दूर करण्यासाठी ज्या संशोधकाने मान्सूनच्या अंदाजाची नवी पद्धत शोधून काढली त्यांचे नाव डॉ. वसंत गोवारीकर.

डॉ. वसंत गोवारीकरांचा जन्म २५ मार्च १९३३ रोजी पुण्यात झाला. शाळेत असताना त्यांना नवनव्या कल्पना सुचायच्या. एकदा त्यांना वाटले आपण मोटार बनवावी. अवघे तेरा वर्षांचे असताना डॉ. गोवारीकर यांनी थेट अमेरिकेतील हेन्री फोर्डला पत्र लिहून आपली इच्छा कळवली. हेन्री फोर्डला मराठी कळणार नाही, म्हणून त्यांनी मित्राची मदत घेऊन मराठीत लिहिलेल्या पत्राचे इंग्रजी भाषांतर केले. हेन्री फोर्डने डॉ. गोवारीकर यांच्या पत्राची दखल घेऊन उत्तरही पाठवले. त्यासोबत काही पुस्तकेही पाठवली. त्यांच्या कुशाग्र बुद्‌धिमत्तेची आणि दृढ संकल्पाची चुणूक लहानपणीच दिसून आली.

कोल्हापूरला पदवीपर्यंतचे शिक्षण झाल्यानंतर उच्च शिक्षणासाठी ते इंग्लंडला गेले. बर्मिंगहॅम विद्‌यापीठात त्यांनी 'रासायनिक अभियांत्रिकी' विषयात संशोधन केले. पुढे इंग्लंडच्या ऊर्जा संशोधन केंद्रात संशोधक म्हणून त्यांनी काम केले.

विक्रम साराभाई यांच्या आग्रहामुळे १९६७ साली ते भारताच्या अवकाश संशोधन केंद्रात रुजू झाले. 'घन पदार्थातील ऊर्जा' या विषयाच्या संशोधनासाठी त्यांच्या पुढाकाराने नवा प्रकल्प सुरू करण्यात आला. भारताच्या विज्ञान क्षेत्रात त्यांनी केलेली कामगिरी फार मोठी आहे. अग्निबाणाच्या मोटारीकरिता घन इंधन बनवण्याचे तंत्र त्यांनी विकसित केले.

## स्वाध्याय



**प्र. १. भारतीय संशोधकांची नावे व त्यांनी लावलेले शोध यांची माहिती घेऊन तक्ता तयार करा. वर्गात लावा.**

**प्र. २. कोणकोणत्या गोष्टींमध्ये संशोधन व्हावे असे तुम्हांला वाटते? विचार करा व लिहा.**

**प्र. ३. खालील वाक्यांचे वचन बदलून वाक्ये पुन्हा लिहा.**

उदा., भिंत कोसळली – भिंती कोसळल्या.

| | | |
|---|---|---|
| (१) | मला कविता आठवली. | |
| (२) | त्याने खुर्ची ठेवली. | |
| (३) | मधू आंबा खा. | |

BT2LPT

**उपक्रम :** आंतरजालाचा उपयोग करून डॉ. वसंत गोवारीकर यांची माहिती मिळवा. कोलाज तयार करा.

**प्रकल्प :** वर्तमानपत्रात शास्त्रज्ञ, संशोधक यांच्याविषयी येणाऱ्या माहितींची कात्रणे काढून चिकटवही बनवा.